e Paper

आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in शुक्रवार दिनांक 17/06/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 101 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# विधान परिषद निवडणूक जाहीर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : भारत निवडणूक आयोग यांनी महाराष्ट्र विधान परिषदेच्या 9 जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. या निवडणुकीसाठी 12 मे 2026 रोजी मतदान होणार असून त्याच दिवशी निकालही जाहीर केला जाणार आहे.**

जाहीर कार्यक्रमानुसार, 23 एप्रिल रोजी अधिसूचना जारी होणार असून 30 एप्रिल ही उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख आहे. अर्जांची छाननी 2 मे रोजी होणार आहे, तर 4 मेपर्यंत उमेदवारांना अर्ज मागे घेण्याची संधी असेल. 12 मे रोजी सकाळी 9 ते सायंकाळी 4 या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडेल. त्यानंतर सायंकाळी 5 वाजता मतमोजणी सुरू होऊन त्याच दिवशी निकाल स्पष्ट होणार आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया 13 मे 2026 पर्यंत पूर्ण केली जाणार आहे.

दरम्यान, विधान परिषदेच्या या 9 सदस्यांचा कार्यकाळ 13 मे रोजी संपुष्टात येणार असल्यामुळे ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

सध्याच्या महाराष्ट्र विधानसभेतील संख्याबळ पाहता महायुतीचे पारडे स्पष्टपणे जड असल्याचे दिसून येते.



## 9 जागांसाठी 12 मे रोजी मतदान

भाजपकडे 131 आमदार, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे 57 आमदार, तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडे 40 आमदार आहेत. या संख्याबळाच्या जोरावर महायुतीचे 8 उमेदवार सहज निवडून येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दुसरीकडे, महाविकास आघाडीचे एकूण संख्याबळ 46 असल्याने त्यांचा केवळ एकच उमेदवार सहज विजयी होऊ शकतो. दुसऱ्या जागेसाठी त्यांना सुमारे 10 मतांची जुळवाजुळव करावी लागणार असून, सध्याच्या राजकीय परिस्थितीत ते आव्हानात्मक मानले जात आहे.

विधान परिषेचा एक सदस्य निवडून येण्यासाठी 28 मतांचा कोटा आवश्यक आहे. मात्र राष्ट्रवादी काँग्रेसकडे अतिरिक्त 13 मते असल्यामुळे महायुतीने अतिरिक्त उमेदवार दिल्यास निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता कमी असल्याचे संकेत मिळत आहेत.

**कोणाला किती जागा?**

**सध्याच्या समीकरणानुसार—**

भाजप: 5 जागा

शिवसेना (शिंदे गट): 2 जागा

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट): 1 जागा

महाविकास आघाडी: 1 जागा

**अशी शक्यता वर्तवली जात आहे.**

अधिसूचना: 23 एप्रिल 2026

अर्ज भरण्याची शेवटची तारीख: 30 एप्रिल 2026

छाननी: 2 मे 2026

अर्ज मागे घेणे: 4 मे 2026

मतदान: 12 मे 2026 (सकाळी 9 ते सायं. 4)

मतमोजणी: 12 मे 2026 (सायं. 5 वाजता)

प्रक्रिया पूर्ण: 13 मे 2026

# सीबीएसई दहावीत मुलींची बाजी; महाराष्ट्राचा निकाल 96%

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) यंदापासून ‘टू बोर्ड परीक्षा’ धोरण लागू केले आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना गुण सुधारण्यासाठी अतिरिक्त परीक्षा देता येणार आहे. या धर्तीवर सीबीएसई मंडळाने 15 एप्रिल रोजी दहावीच्या पहिल्या परीक्षेचा निकाल जाहीर केला.

या परीक्षेचा निकाल 93.70 टक्के इतका लागला आहे. या परीक्षेमध्येही पुन्हा एकदा मुलींनीच बाजी मारली. मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण 94.99 टक्के, तर मुलांच्या उत्तीर्णतेचे प्रमाण 92.60 टक्के इतके आहे.सीबीएसईमार्फत यंदा 17 फेब्रुवारी ते 11 मार्चदरम्यान इयत्ता 10 वीची परीक्षा घेण्यात आली होती. या



परीक्षेला देशभरातून सुमारे 25 लाख विद्यार्थी बसले होते.

परीक्षेचा निकाल पाहण्यासाठी cbse.gov.in, results.cbse.nic.in या अधिकृत संकेतस्थळांसह UMANG App आणि DigiLocker या प्लॅटफॉर्मचा वापर विद्यार्थ्यांना करता येणार आहे. त्यामध्ये परीक्षा क्रमांक, शाळा क्रमांक, प्रवेशपत्र, जन्मतारीख, सिक्युरिटी पिन ही माहिती भरून सबमिट बटण क्लिक केल्यानंतर विद्यार्थ्यांना मार्कशीट उपलब्ध होणार आहे.सीबीएसईच्या आकडेवारीनुसार, या परीक्षेमध्ये 95 टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या 2.24 टक्के इतकी आहे. तर 90टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण 8.96 टक्के इतके आहे. विशेष गरजांच्या विद्यार्थ्यांनी यंदा उल्लेखनीय यश मिळवले आहे. एकूण 9 हजार 443 विद्यार्थ्यांपैकी 9 हजार 88 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे.विशेष गरजा असलेल्या या विद्यार्थ्यांचा निकाल 96.24 टक्के इतका लागला आहे. यातील 452 विद्यार्थ्यांनी 90 टक्क्यांपेक्षा जास्त, तर 91 विद्यार्थ्यांनी 95 टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले आहेत.सीबीएसईच्या निकालामध्ये विभागनिहाय तिरुवनंतपुरम व विजयवाडा विभागाचा निकाला सर्वाधिक 99.79 टक्के इतका लागला आहे. त्याखालोखाल चेन्नई विभागाचा निकाल 99.58 टक्के, दिल्ली पश्चिम विभागाचा निकाल 97.45 टक्के, दिल्ली पूर्व विभागाचा निकाल 97.33 टक्के, तर गुवाहाटी विभागाचा निकाल सर्वात कमी 85.32 टक्के इतका लागला.

# कौशल्यम लाईटहाऊस सारख्या प्रकल्पामुळे युवकांना रोजगाराच्या नव्या संधी- महापौर रवि लांडगे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : कौशल्यम लाईटहाऊससारखे आणखी प्रकल्प निर्माण करण्याची सध्या गरज असून, महापौर युवा रोजगार संकल्प योजनेतून सुद्धा रोजगारनिर्मिती केली जात आहे. अशा प्रकारे प्रत्येक तरुण-तरुणीला रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहू, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.**



निगडी येथील यमुनानगर परिसरातील कौशल्यम लाईटहाऊस प्रकल्पाची महापौर रवि लांडगे यांनी पाहणी करीत या प्रकल्पाचा आढावा घेतला. येथील प्रशिक्षण प्रक्रियेची माहिती जाणून घेत त्यांनी प्रकल्पातील यशस्वी युवकांशी संवाद साधला व त्यांच्या यशाचे कौतुक करत त्यांचा गौरव केला.

यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, नगरसदस्य उत्तम केंदळे, अनिल घोलप, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, लाईट हाऊस कम्युनिटीजच्या सीईओ अमृता बहुलेकर, प्रकल्प प्रमुख दीपिका केडिया तसेच लखन रोकडे, अक्षय किटे, वैभव कोल्हे, अभिजित कांबळे आदी उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे म्हणाले, बदलत्या काळानुसार कौशल्याधारित शिक्षणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, उद्योगांच्या गरजेनुसार प्रशिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. अशा उपक्रमांमुळे युवकांना केवळ नोकरीच नव्हे, तर स्वावलंबी होण्याची संधी मिळत आहे. भविष्यात अशा प्रकल्पांचा विस्तार करून अधिकाधिक तरुणांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे,असे देखील त्यांनी सांगितले.

यावेळी महापौर रवि लांडगे यांनी प्रशिक्षणाची गुणवत्ता, रोजगार संधी आणि विद्यार्थ्यांचा प्रतिसाद याबाबत समाधान व्यक्त केले. या प्रसंगी शिवमूर्ती सोनटक्के, सुमेधा ढाके, सुमित कुंभकरण, शंकर प्रसाद, ऋचा लोंढे, अक्षय माने या नोकरी प्राप्त झालेल्या तसेच ओम सुर्वे, सचिन जाधव, प्रीती कोळेकर, आरती होलाडे या स्किल कोर्स पूर्ण केलेल्या युवक-युवतींचा सत्कार करण्यात आला. कौशल्य विकासाच्या माध्यमातून शहरातील अधिकाधिक युवकांना सक्षम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# नेहरूनगरमध्ये मध्यरात्री दहशत

## तरुणावर सिमेंट ब्लॉकने जीवघेणा हल्ला, चौघांविरुद्ध गुन्हा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड शहरातील नेहरूनगर परिसरात मध्यरात्रीच्या सुमारास घडलेल्या धक्कादायक घटनेत एका तरुणावर सिमेंटच्या ब्लॉकने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी संत तुकाराम नगर पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना दि. 14 एप्रिल 2026 रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास संतोषी माता चौक, नेहरूनगर, पिंपरी येथे घडली. त्यानंतर रात्री 11.45 वाजण्याच्या सुमारास पवार पेट्रोलपंपजवळील बालाजी ट्रेडर्स दुकानासमोर पुन्हा हल्ला करण्यात आला.

या प्रकरणी दानिश आरिफ शेख (वय 18, रा. नेहरूनगर, पिंपरी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार, आरोपी शहाबाज उर्फ टिपु शहा (वय 30), इरशाद शहा (वय 32), सुरज उर्फ आसीफ शेख (वय 21) आणि रामा चौधरी (वय 25) यांनी संगनमत करून फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांवर हल्ला केला.

घटनेदरम्यान आरोपींनी प्रथम फिर्यादीचे नातेवाईक फरहान अकबर खान यांना शिवीगाळ करत मारहाण केली. त्यानंतर काही वेळातच आरोपींनी पुन्हा एकत्र येत फिर्यादी व त्यांच्या वडिलांवर हल्ला चढवला. आरोपी इरशाद शहा याने फिर्यादीस पकडून खाली पाडले, तर मुख्य आरोपी शहाबाज उर्फ टिपु शहा याने रस्त्याच्या कडेला पडलेला सिमेंटचा ब्लॉक उचलून "इसको अब खत्म कर देंगे" अशी धमकी देत फिर्यादीच्या चेहऱ्यावर जोरदार प्रहार केला.

या हल्ल्यात फिर्यादीच्या नाकाला गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता 2023 अंतर्गत कलम 109, 115, 352, 3(5) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, आरोपी क्रमांक 3 व 4 यांना पोलिसांनी अटक केली असून उर्वरित आरोपींचा शोध सुरु आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडे करत आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक 17/06/2026

e Paper

पिंपरी चिंचवड | पुणे

# पिंपरी-चिंचवडच्या विकासकामांना 'स्थायी'ची मंजुरी!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची स्थायी समिती सभा सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधूकर पवळे सभागृहात पार पडली. सभेच्या सुरुवातीला दिवंगत गायिका पद्मविभूषण आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर सभेच्या कामकाजाला सुरुवात झाली.**



यावेळी स्थायी समिती सदस्यांसह महापालिका आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, नगरसचिव मुकेश कोळप यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेत शहरातील पायाभूत सुविधा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण व प्रशासनाशी संबंधित विविध महत्त्वपूर्ण विषयांना मंजुरी देण्यात आली. विशेषतः झोपडपट्टी व दाट वस्ती भागांमध्ये गटर करणे, स्टॉर्म वॉटर लाईन टाकणे, शौचालयांची दुरुस्ती, रंगरंगोटी व मनपा इमारतींची देखभाल यांसारखी कामे ह, अ, ब, क, ड, इ, फ व ग क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या सिद्धार्थनगर, गुलाबनगर, जयभीमनगर, महात्मा फुलेनगर, भारतमातानगर, राजीव गांधीनगर, विद्यानगर, दत्तनगर, शंकरनगर, इंदियानगर, काळभोरनगर, गांधीनगर, बालाजीनगर, संजय गांधीनगर, शांतीनगर आदी परिसरांमध्ये स्वच्छ सर्वेक्षण 2025-26 अंतर्गत मोठ्या प्रमाणावर राबविण्यात येणार आहेत.

शहरातील रस्ते व वाहतूक सुधारण्यासाठी निगडी-दापोडी रस्त्यावरील बसस्थानक व डेडिकेटेड लेन दुरुस्ती, सांगवी-किवळे रस्त्याचे डांबरीकरण, निगडी टिळक चौक ते दुर्गानगर रस्त्यावरील कामे, तसेच प्रभाग क्र.2 मधील चिखली महादेवनगर, रोकडेवस्ती, मोशी व जाधववाडी परिसरातील अंतर्गत रस्त्यांचे हॉटमिक्स व बीबीएम पद्धतीने डांबरीकरण करण्यास मान्यता देण्यात आली. प्रभाग क्र.16 मधील रावेत, वाल्हेकरवाडी व किवळे येथील रस्त्यांची दुरुस्ती, प्रभाग क्र.24 मधील सदाशिव कॉलनी, श्रीकृष्ण कॉलनी, आनंद पार्क परिसरातील रस्ते कॉंक्रीटीकरण, तसेच प्रभाग क्र.25 मधील वाकड, पुनावळे, ताथवडे भागांमध्ये विविध विकासकामे करण्यात येणार आहेत. पिंपळे निलख, विशालनगर, कस्पटेवस्ती, वेनुनगर, कावेरीनगर परिसरात पावसाळी पाण्याच्या लाईनची दुरुस्ती व नवीन पाईपलाईन टाकणे, तसेच फूटपाथ व पेव्हिंग ब्लॉक दुरुस्तीची कामेही हाती घेण्यात येणार आहेत.

वाहतूक व नागरी नियोजनाच्या दृष्टीने पिंपळे सौदागर येथील पीके चौक सिग्नल फ्री करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार नेमणे, तसेच पिंपळे गुरव येथील वाकड ते नाशिक फाटा रस्त्यावर कल्पतरू चौकात सबवे उभारण्यासाठी सल्लागार नेमण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच प्रभाग क्र.27 मधील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात रेलिंग करणे व मनपा शाळांमधील स्थापत्य विषयक कामेही करण्यात येणार आहेत.

आरोग्य सेवांच्या बळकटीकरणासाठी कै. प्रभाकर मल्हारराव कुटे स्मृती रुग्णालय, आकुर्डी व नवीन भोसरी रुग्णालयातील क्ष-किरण विभागासाठी बॅटरी खरेदी, जैववैद्यकीय घनकचरा व्यवस्थापन, तसेच नवीन थेरगाव गावठाण येथे 340 खाटांच्या मल्टीस्पेशालिटी रुग्णालयासाठी फर्निचर खरेदीस मान्यता देण्यात आली. याशिवाय यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात मानधन तत्त्वावर विविध पदांची भरती करण्यासही मंजुरी देण्यात आली आहे. आरोग्य विभागासाठी 4 सक्शन युनिट वाहने व प्रत्येकी 2 मजूर उपलब्ध करून देण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

महापालिकेच्या प्रशासकीय व शैक्षणिक कामकाजासाठी महत्त्वाचे निर्णय घेत मनपा शाळांमध्ये 138 डेटा एन्ट्री ऑपरेटर (प्राथमिक 120 व माध्यमिक 18) 24 महिन्यांसाठी नेमण्यास, विद्यार्थ्यांच्या परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका, प्रगतीपुस्तके व प्रवेश फॉर्म छपाईस, तसेच संगणकीय केबल नेटवर्क उभारणीस मान्यता देण्यात आली. महापालिकेचा विकास आराखडा मराठी भाषेत प्रसिद्ध करण्यासाठी येणाऱ्या खर्चासही मंजुरी देण्यात आली. तसेच ई-मेल अकाऊंटचे नूतनीकरण व दैनंदिन देखभाल कामास मुदतवाढ देण्यात आली आहे.

स्वच्छता व पर्यावरणाच्या दृष्टीने शौचालय साफसफाई व देखभाल करणाऱ्या महिला बचत गटांना 6 महिन्यांऐवजी 11 महिन्यांची मुदतवाढ, त्यांच्या मानधनात वाढ, तसेच शून्य कचरा प्रकल्पांतर्गत मे. आसरा सोशल फाऊंडेशन संस्थेस 17 शाळांमध्ये प्रकल्प राबविण्यास मान्यता देण्यात आली. श्रीकृष्ण महिला बचत गटाच्या वेतन खर्चासही मंजुरी देण्यात आली आहे.

महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या कामकाजासाठी वाहन भाडेतत्वावर घेणे, अग्निशमन विभागातील 11 वाहनांची दुरुस्ती, प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहातील फायर सेफ्टी ऑडिटनुसार कामे, स्मशानभूमींमध्ये चिमणी बसविणे, रस्ते दुभाजकांची देखभाल, गटार व रस्ते साफसफाई, अतिक्रमण व अनधिकृत बांधकामांवर कारवाई, आपत्ती व्यवस्थापनासाठी यंत्रसामग्री उपलब्ध करून देणे या कामांसाठीही खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

याशिवाय पीएमपीएमएलच्या सन 2025-26 या आर्थिक वर्षातील नियमित संचलन तुटीसाठी अनुदान देण्यास तसेच पीजीआय/वायसीएमएच (PCMC) साठी विविध शासकीय व विद्यापीठ शुल्क भरण्यास मान्यता देण्यात आली आहे.

एकूणच, स्थायी समिती सभेत शहरातील सर्वांगीण विकास, मूलभूत सुविधा बळकटीकरण, आरोग्य व स्वच्छता सुधारणा, तसेच प्रशासन अधिक कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने व्यापक निर्णय घेण्यात आले आहेत.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शुक्रवार दिनांक 17/06/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# थेरगावमध्ये बटरफ्लाय गार्डनला वेग

## सभापती अभिषेक बारणे यांच्याकडून 'बटरफ्लाय गार्डन'च्या कामाची पाहणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**थेरगाव: उद्याने ही शहराचे वैभव असून पर्यावरणाचा समतोल राखण्यासोबतच शहराचे सौंदर्य वाढविण्याचे काम करत असतात. याच पार्श्वभूमीवर थेरगाव प्रभाग क्रमांक 23 येथे साकारण्यात येत असलेल्या निसर्गरम्य 'बटरफ्लाय गार्डन'च्या कामाची पिंपरी चिंचवड महापालिकेचे स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी आज महापालिका अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पाहणी करून सविस्तर आढावा घेतला. गेल्या अनेक वर्षांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर आता या उद्यानाच्या कामाला मूर्त स्वरूप प्राप्त झाले असून सध्या हे काम प्रगतीपथावर आहे.**



या पाहणी दौऱ्यादरम्यान सभापती अभिषेक बारणे यांनी नागरिकांसाठी हे उद्यान अधिक सुंदर, स्वच्छ आणि सुविधायुक्त व्हावे या दृष्टीने अधिकाऱ्यांना महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. यामध्ये प्रामुख्याने महिला व पुरूषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय करणे, उद्यानातील झाडांची संख्या वाढवणे आणि परिसरातील ड्रेनेज लाईनची पाहणी करून योग्य नियोजन लावण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याची उत्तम व्यवस्था, मुख्य प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षक, पार्किंग आणि नियमित स्वच्छतेसाठी ठोस व्यवस्थापन प्रणाली (मेंटेनन्स शेड्युल) तयार करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या. उद्यानामध्ये पक्षांना आकर्षित करणारी स्थानिक फुलझाडे आणि औषधी वनस्पतींची लागवड करण्यावरही त्यांनी भर दिला.

या प्रसंगी उद्यान अधीक्षक योगेश वाळुंज, सहाय्यक उद्यान अधीक्षक राजेश वसावे, उद्यान निरीक्षक सुनील नाळे, उद्यान सहाय्यक हनुमंत चाकणकर, उद्यान विभागाचे अरविंद कदम, उपअभियंता रमेश निवृत्ती जिंतीकर, कनिष्ठ अभियंता विकास दत्तात्रेय गोसावी यांच्यासह माजी स्वीकृत नगरसेवक संदीपजी गाडे व प्रभागातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. थेरगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणाऱ्या या उद्यानामुळे परिसरातील नागरिकांना लवकरच एक हक्काचे विरंगुळा केंद्र उपलब्ध होणार आहे.



> थेरगावचे हे बटरफ्लाय गार्डन शहराच्या सौंदर्यात भर टाकणारे ठरेल. नागरिकांना एक स्वच्छ, सुंदर आणि सुविधायुक्त विरंगुळा केंद्र उपलब्ध करून देणे हे आमचे कर्तव्य आहे. उद्यानाचे काम दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्याकडे आमचा कटाक्ष राहील.
>
> **अभिषेक बारणे**
> (सभापती, स्थायी समिती, पिं.चिं.महापालिका)

# आंब्याचे आमिष दाखवून अडीच वर्षीय चिमुरडीवर लैंगिक अत्याचार, नराधमाला अटक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड : काळेवाडी परिसरातील एकतानगर भागात माणुसकीला काळीमा फासणारी एक संतापजनक घटना उघडकीस आली आहे.

केवळ अडीच वर्षांच्या चिमुरडीला आंब्याचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी 47 वर्षीय नराधमाला काळेवाडी पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. विजय भोसले असे ताब्यात घेतलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी एकच्या सुमारास ही घटना घडली. आरोपीने पीडित मुलीला आंबा खायला देण्याच्या बहाण्याने आपल्या खोलीत बोलावले आणि तिथे तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. मंगळवारी सकाळी चिमुरडीला त्रास होऊ लागल्याने पालकांनी तिला तातडीने महापालिकेच्या रुग्णालयात दाखल केले. तिथे डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर हा धक्कादायक प्रकार समोर आला. आईने विश्वासात घेऊन विचारले असता, मुलीने आरोपीने घरात बोलावून अत्याचार केल्याचे सांगितले. घटनेचे गांभीर्य ओळखून रुग्णालय प्रशासनाने पोलिसांना पाचारण केले. काळेवाडी पोलिसांनी तत्परता दाखवत एक पथक रुग्णालयात तर दुसरे पथक आरोपीच्या घरी पाठवून त्याला तातडीने अटक केली.



याप्रकरणी पीडित मुलीच्या 28 वर्षीय आईने फिर्याद दिली असून, या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे...

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968